Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed


Multidisciplinary International Research Journal

April -2023

ISSUE No - (CDVI) 406

Volume-B

## Research Methodology in Social Science and Commerce




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande

**Executive Editors**
Prin. Dr. K. HariBabu
Prin. Dr. S. T. Jadhav
Prin. Dr. A. N. Gharde

**Editors**
Dr. Vaibhav P. Kawade
Dr. Santosh S. Kale
Dr. Santosh Gaikwad

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 21 | Agro Tourism: Exploring New Avenues Of Economic Development In Rural India<br>BijuVarghese Anchekaril , Dr.Sebastian Tharapil Joseph | 82 |
| 22 | Significance Of Environmental Audit In Sustainability of Environment<br>Asst.Prof –Sangeeta Patel | 95 |
| 23 | भारतातील नवीन आर्थिक सुधारणांची भूमिका डॉ. राजेश सुधाकर डोंगरे | 97 |
| 24 | महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रातील रिक्त जागांवरील उपाय डॉ.मारुती बाबुराव कातकडे | 101 |
| 25 | मुलाखत तंत्राचे गुण – दोष डॉ. रमेश वि. मोरे | 104 |
| 26 | शिवरायांचे आदर्श व्यक्तिमत्व शेख अनिसा महेबुब | 108 |
| 27 | संशोधन पध्दतीतील संशोधन प्रकियेचाएक अभ्यास प्रा.डॉ. राजेश गोजे | 112 |
| 28 | हवामान बदलाची आव्हाने व उपाय अभिषेक संजय पद्मावार , डॉ. करमसिंग रा.राजपूत | 117 |
| 29 | महात्मा फुले यांचे कृषी विचार सुरेखा नवनाथ सातव | 121 |
| 30 | वाणिज्य विषयातील संशोधनाचे महत्व व आव्हाने डॉ. प्रशांत म. पुराणिक | 125 |
| 31 | मोबाईल ओपॅक अॅप्स महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी वरदान आहे.<br>डॉ. प्रशांत बी. चहारे | 130 |
| 32 | हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाचे समाजिक आणि राजकीय योगदान :एक चिकित्सक अभ्यास प्रा. रवि देविदास चव्हाण | 134 |
| 33 | उस्मानाबाद जिल्ह्यातील खवा उत्पादकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास:विशेष संदर्भ परंडा तालुका. लांडगे कृष्णा दगडू | 137 |
| 34 | अर्थशास्त्रीय संशोधन डॉ. मोहन व्यंकटराव बंडे | 141 |
| 35 | कोळसा खाणीमध्ये कार्यरत कोळसा कामगारांवर जागतिक तापमान वाढीचा पडणारा प्रभाव सागर शंकर बरशेट्टीवार , प्रा. डॉ. करमसिंग रा. राजपूत | 145 |
| 36 | हरित बॅंकिंग : पर्यावरणीय हानी रोखण्यात बॅंकांची भूमिका<br>मलकापुरे एस. एम | 148 |
| 37 | भारतातीलकृषी विषयकशासकिय योजनांचाग्रामीण विकासातील भूमिका–एक अभ्यास प्रा. ज्ञानेश्वर पावडे ,प्रा. डॉ. राजेश गोजे | 151 |
| 38 | मुक्तिबोध के काव्य में समाजवाद डॉ. चौधरी निलोफर महेबुब | 155 |
| 39 | अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती एक अभ्यास प्रा. डॉ. बालाजी वि. डाकोरे | 159 |
| 40 | The Use of Social Media Networking on Today's Library system<br>Dr. Sontakke Dnyandeov Manik , Dr. Sangle Sandip N. | 162 |
| 41 | The impact bankruptcy of Silicon Valley Bank: special reference to start up company of India Mr.Nitin Gaikwad, Dr.Vilas Eppar | 167 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDVI) 406- B
ISSN : 2278-9308
April, 2023

# अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती एक अभ्यास

प्रा. डॉ. बालाजी वि. डाकोरे
श्री मधुकरराव बापुराव पाटील खतगावकर महाविद्यालय, शंकरनगर
Mo. No.9403527569 ,dakorebalaji@gmail.com

**प्रस्तावणा :-**

अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. विसाव्या शतकात सामाजिक शास्त्राच्या अभ्यासातून निर्माण होणा-या ज्ञानाच्या जोरावर साजिक जीवनातील अनेक मानवी प्रश्न सोडविणे शक्य झाले आहे. न्यु सेंच्यूरी शब्दकोशाप्रमाणे संशोधन एखादया विषयाचा सातत्यपूर्ण, काळजीपुर्वक पध्दतशीर अभ्यास करणे अशा अभ्यासाचे उदिष्टे नविन माहिती गोळा करणे किंवा नविन तत्थ शोधुन काढणे हे असते. शास्त्राचे वर्गीकरण जसे शुध्द व सामाजिक शास्त्र असे केले जाते. जसे मुलभूत संशोधन व उपयोजित संशोधन शुध्द संशोधनात व्यापक तत्थ, नियम यांचा शोध्र घेण्याचा प्रयत्न केला जाते याचे उदाहरण म्हणजे आईनस्टाईनचा सापेक्षवाद सिध्दांत, न्युटनचा गुरुत्वाकर्षन सिध्दांत, नारळीकर यांचा विश्वाच्या उत्पती संबंधीचा सिध्दांत हे मुलभूत संशोधनाचे प्रकार आहेत. ज्या संशोधनात ज्ञानाचा वापर लगेच कोणत्या ना कोणत्या स्वरुपात व्यावहारिक उपयोगासाठी केला जातो त्या संशोधनास उपयोजित संशोधन असे म्हणतात. उपयोजित संशोधनाचा हेतू पुढील प्रकारचा असतो, तथ्ये गोळा करणे किंवा अशी एखादी पध्दती शोधून काढणे की, जिचा वापर पत्यक्ष ठराविक व्यावहारिक कामासाठी लगेच करता येणे शक्य होईल. अर्थात मुलभूत संशोधन व उपयोजित संशोधन एकमेकापासून पुर्णत: वेगळे करता येईल असे नाही. एका अर्थाने संशोधनाच्या प्रत्येक प्रयत्नात कमी अधीक प्रमाणात शुध्द व उपयोजित संशोधनाचे मिश्रण झालेले असते. १८ व्या शतकात अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र एकत्रितरित्या सामाजिकशास्त्र संज्ञेखाली अभ्यासली जात होती. २० व्या शतकात प्रत्येक शाखेने स्वतंत्र शाखा निर्माण करुन आपापल्या विद्याशाखेचे महत्व संशोधन साहित्याधारे प्रस्थापित केले आहे. अर्थशास्त्रीय संशोधनात बाजारपेठविषयक वर्गीकरण, आर्थिक घडामोडीचे विश्लेषण, जागतिक अर्थव्यवस्थेतील आपल्या देशाचे स्थान इत्यादी बहुविध समस्याबाबत अर्थशास्त्रीय संशोधन केले जाते. साजिक शास्त्रामध्ये अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, तत्वज्ञान इ. चा समावेश होतो. सामाजिक शास्त्र संशोधनाचे वर्गीकरण सैध्दांतीक संशोधन घटना आधारित विश्लेषनात्मक संशोधन व तत्सम सामाजिक संशोधन असे केले जाते. अर्थशास्त्रीय संशोधनाचे अभ्यास क्षेत्र मानवी व्यवहार हे आहे. माणुस ज्या समाजात राहतो तो समाज व संबंधीत व्यक्ती किंवा व्यक्तीगट यांच्या आर्थिक प्रेरणाचा परस्पर परिणाम लक्षात घेणे व त्यातून व्यक्त होणारे मानवी आर्थिक वर्तणुकीचे काही सार्वत्रिक स्वरुपाचे साकार स्पष्ट करणे हे अर्थशास्त्रीय संशोधनाचे मुलभूत स्वरुप आहे.

**अभ्यासाचे उदिष्टे :-**

- संशोधनाचे कार्य किंवा उदिष्टये यांचा अभ्यास करणे.
- संशोधन व शास्त्रीय प्रवृत्ती जाणून घेणे.
- संशोधकाची आवश्यक लक्षणे यांचा अभ्यास करणे.

**माहिती संकलण :-**

या पेपरमध्ये अभ्यासकाने दितीय सामुग्रीवरील माहितीचा वापर केला आहे ज्यामुळे पुस्तके, क्रमिक पुस्तके, ऑनलाईन माहिती गोळा केली आहे.

**अर्थशास्त्रीय संशोधन :-**

अर्थशास्त्रीय संशोधन म्हणजे जीवनाच्या आर्थिक व्यवहारास मार्गदर्शक ठरतील असे नियम किंवा सिध्दांत मांडण्यासाठी आर्थिक माहिती किंवा तत्ये संकलीत करणे, ती शीस्तबध्द स्वरुपात मांडणे, तिचे शास्त्रीय विश्लेषण करणे, निरीक्षण व अनुभवातून मिळालेल्या ज्ञानाचा वापर करुन अनेकविध कारणाचे तात्कालिक व अंतीम परिणाम काय होतील हे निशचित करणे.

**संशोधन प्रक्रिया :-**

संशोधन विषय निशचित करण्यापासून अर्थशास्त्रीय संशोधनातील संशोध्र प्रक्रियेची सुरुवात होते. या प्रकारच्या संशोधनाचे उदिष्टे सत्य शोधून काढणे हे असते. त्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब संशोधक करीत असतो. अनेक टप्प्यात विभागलेल्या वैज्ञानिक पध्दतीला संशोध्र प्रक्रिया असे म्हणतात. संशोधनात खालील घटकाचा विचार करण्यात येतो ते घटक म्हणजे कशाचे, कोणाचे, कसे का, निरीक्षण करायचे निरीक्षणाची नोंद कशी ठेवावी. विश्लेषण

कसे कराल, निष्कर्ष कसे काढाल इत्यादी संशोधन प्रक्रियेच्या अंतर्गत संशोधनाचे शीर्षक शक्य तेवढे निशचित समस्याची व्याप्ती सामान्य असावी. संशोधन विषयाचा हेतू प्रोत्साहानात्मक वर्तमान संशोधन अभ्यासाची नोंद ठेवणे हा असावा. साहित्याचा परामर्श घेताना संशोधकांनी यापुर्वी ज्या कोणी संशोधकांनी या विषयावर संशोधकाचे चिकीत्सक मुल्यमापन करणे हे जास्त महत्वपुर्ण व योग्य दृष्टीने संशोधनासाठी उपयोगी ठरते. संशोधन करतांना नेमके कशाबाबतचे संशोधन करावयाचे आहे, काय शोधून काढावयाचे आहे, माहिती कशी संकलीत करायची याबाबत सविस्तर चिकित्सा करावी लागते. संशोधनाची सुरुवात करताना संशोधकाने निवडलेल्या संशोधन विषयातील कोणत्या बाबीला महत्व दयावयाचे हे ठरवावे याचाच अर्थ संशोधकांने संशोधनाची दिशा निशचित करावी. संशोधनाची उदिष्टये प्रामुख्याने संशोधनाच्या आराखडयाची रुपरेषा ठरवितांना उपयोगी पडतात. अल्पकालीन आणी दिर्घकालीन उदिष्टये निषचित करावे लागतात. अर्थशास्त्रीय संशोधनात गृहीतकांना महत्वाचे स्थान आहे. संशोधनाचा आराखडा तयार करतांना प्रत्येक संकल्पनेचा अर्थाचा उपयोग योग्य आणी काळजीपुर्वक तयार करावा लागतो. संशोधनाच्या विषयास अनुसरुन माहिती संकलीत करावी लागते त्यासाठी मुलाखत पध्दती, अनुसुची सर्वेक्षण, ऐतिहासीक व्याप्ती अध्ययन पध्दती याचा वापर करावा लागतो. तथ्य संकलन केले जाते. तेव्हा तथ्य संकलनासाठी विविध पध्दतीचा अवलंब केला जातो. या संशोधनात प्रस्तावलीची भुमिका महत्वाची असते. माहितीचे पध्दतशीर संकलन केल्यास त्याचे शास्त्रीय विश्लेषन करता येते व काही निष्कर्षापर्यंत पोहचता येते.

तालीकीकरण फलीतांचा आशयपुर्ण मार्ग म्हणजे प्रत्येक टप्यात स्वतंत्र आणी विशेष कलावापरुन योग्य शीर्षक देणे, चौकशीचे किंवा संशोधनाचे निश्कर्ष अनवयार्थ तसेच निश्कर्ष तपसाणी ही संशोधन आराखडयात महत्वाची पायरी आहे. वर्तमान संशोधनाचे निश्कर्ष आणी सूचना हे भविष्यातील संशोधनासाठी उपयोगी पडतात. शेवटी संदर्भ सुची लिहिण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत.

**संशोधन आराखडा :–**

अर्थशास्त्रीय संशोधनात संशोधन आराखडयास विशेष महत्व आहे. कारण संशोधन प्रारंभ करण्यापुर्वी प्रथम संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्यात संशोधनाचा उद्देश अध्ययन संशोधन क्षेत्र कालावधी संशोधनासाठी आवश्यक माहिती गोळा करणे ती किती व कशी करावी, नमुना निवडीचे आधार कोणते, माहिती मिळविण्याची साधने, माहितीचे विश्लेषन, संशोधन कार्याचा खर्च इत्यादी अनेक गोष्टी प्रारंभीच ठरवाव्या लागतात.

**माहिती संकलन पध्दती :-**

अर्थशास्त्रीय संशोधनात विशीष्ट शास्त्र पध्दतीचा व तंत्राचा संशोधकास अवलंब करावा लागतो या विषयातील संशोधनात समस्याविधान निशचित केल्यावर त्यासंबंधी तथ्य माहिती व सामुग्रीचे संकलन करावे लागते. संधोधनाविषयी संबंधीत असणा-या संकल्पनाची निर्मीती करावी लागते. थोडक्यात तथ्य संकल्पना आणी सिध्दांत ही संशोधन कार्याची आधार तत्थ आहेत.

कोणत्याही संशोधन अध्ययनात प्राथमिक आणी द्वितीय असे तथ्य संकल्पनाचे दोन स्त्रोत असतात, निरिक्षण, मुलाखत, प्रश्नावली इत्यादीदद्वारे संकलीत तथ्यांना प्राथमिक तथ्य असे म्हणतात. प्राथमिक तथ्याशीवाय संशोधकांनी अध्ययनाविषयी संबंधीत द्वीतीयक तंत्रसामुग्रीसुध्दा संकलीत केलेली असते. व्यक्तीक आणी सार्वजनिक कागदपत्रे हे द्वीतीयक तथ्य सामुग्रीचे स्त्रोत आहेत. तथ्याचे विश्लेषन व निर्वचन करण्यासाठी संशोधकाला वरील दोन्ही प्रकारच्या संकलीत तथ्य सांमुग्रीचे संपादन करावे लागते.

**संख्याशास्त्रीय साधने :-**

अर्थशास्त्रीय संशोधनात संकलीत माहितीचे विश्लेषन करताना संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करावा लागतो. त्यात प्रामुख्याने संकलीत केलेल्या माहिती व प्रक्रीया करताना ते संपादन करणे, संक्षीप्त चिन्हाचा वापर करणे, वर्गीकरण करणे आणी तालिकीकरण करणे यांचा त्यात समावेश होतो.

**संशोधन अहवाल :-**

संशोधन अहवाल ही संशोधन प्रक्रियेतील महत्वाची आणी शेवटची अवस्था आहे. अहवाल अभ्यासाची ग्रहीतके, उदिष्टे माहिती संकलन आणी माहितीचे विश्लेषन दिले जाते. अहवाल लेखनामुळे वाचकास संधोधनातील निष्कर्ष समजतात. संशोधनात पुन: संशोधन केले जाते. कोणत्याही नवीन घटनेचे स्पष्टीकरण केले जाते.

**व्यष्टी अध्ययन पध्दती :-**

अर्थशास्त्रीय संशोधनात माहिती असणा-या धटनांच्या आधारे नवीन माहिती या संशोधनातून मिळविली जाते. अनेकवेळा एक व्यक्ती, एक संस्था, एक कुटूंब, एका जातीचा समुह या एकक घटकाची माहिती असते.

**सारांश :-**

सामाजिक शास्त्रात अर्थशास्त्राचा देखील अभ्यास केला जातो. संशोधन म्हणजे सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न व प्रक्रिया होय. मानवी जीवनाच्या विविध अंगाचा व समस्याचा अभ्यास संशोधनात केला जातो. मानवी जीवन अधीक

सुखाचे, सुस्थीर, सुरक्षीत व सुसंस्कृत करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रयत्न केला जातो. संशोधनाचे मुलभूत व उपयोजित संशोधन असे वर्गीकरण केले जाते. संशोधन प्रक्रिया ही सततपणे व अखंडीतपणे चालणारी प्रक्रिया आहे. यातून सत्य शोधून काढणे हे उदिष्टे असते.

संशोधन विषय निशचीत करण्यापासून ते संशोधन अहवाल तयार करेपर्यंत विविध घटकांचा यात अभ्यास करावा लागतो. जसे संशोधन प्रक्रिया संशोधन आराखडा माहिती संकलन पध्दती, संख्यासाधने, अहवाल लेखन इत्यादी अर्थशास्त्रीय संशोधनात समाजजीवनाशी निगडीत घटकाचा अभ्यास केला जातो. अर्थिक व्यवहाराच्या संदर्भातील विविध घटकामधील संबंध अभ्यासले जातात.

संदर्भ :-

1. अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंड ओळख :-प्रा.डॉ. जे. एफ. पाटील, पठाण, ताम्हनकर व यादव प्रकाशक ऋतुपुर्ण, अनिरुध्द, कुलकर्णी,विजयलगार, पुणे.
2. अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती प्रा.डॉ. बी.डी. कुलकर्णी व प्रा.डॉ. ढमढेरे प्रकाशक, दत्तात्रय ग पाष्टे, डायमंड पब्लीकेशन, पुणे.
3) Research Methodology IYCM Open University Dnyangangotri, Nashik.
4) संशोधन पध्दती : डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील चैतन्य पब्लीकेशन, नाशीक.